# जिल्हा व सत्र न्यायालय परभणी

# जाहिर प्रगटन

**विषय :-** जिल्हा व सत्र न्यायालय,परभणी व कौटूंबिक न्यायालय, परभणी न्यायालायात संगणक, प्रिंटर, व यु.पी.एस. चा पुरवठा बाबत...

उपरोक्त विषयी याद्वारे संबंधीतास कळविण्यात येते की, जिल्हा व सत्र न्यायालयाप्रमाणे व कौटूंबिक न्यायालय, परभणी न्यायालयाकरीता संगणक, प्रिंटर, व यु.पी.एस खालील दिलेल्या प्रमाणे खरेदी करणे आहे.

त्याकरिता पुरवठादारांनी आपल्या दर निविदा सीलबंद लिफाफ्यामध्ये टाकुन मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, परभणी यांच्या नावे लिहुन पाकीटावर "<u>संगणक, प्रिंटर, व यु.पी.एस</u> **पुरवठाकरिता निविदा**" असे लिहिलेले असावे. सदर निविदा ही जिल्हा न्यायालय, परभणी येथे **दिनांक <u>२६</u>** <u>फेब्रुवरी २०१९</u> रोजी सायंकाळी ६.०० वाजे पर्यत पोहचतील अशा बेताने सादर करण्यात यावी. या तारखेनंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही याची नोंद यावी.

| **अ.क्र.** | **तपशील** |
|---|---|
| १ | वैयक्तीक संगणक डॉस बेस (HP Slim 270-PO27il, with Monitor 19" 3 years warranty). |
| २ | वैयक्तीक संगणक विंन्डोज बेस (HP Slim 270-PO33in, with Monitor 19" 3 year warranty). |
| ३ | एच.पी. एम १००५ प्रिंटर |
| ४ | चॅम्पीयन यु.पी.एस. ८०० व्ही.ए. |

**<u>सर्वसाधारण अटी व शर्ती:-</u>**

१. निविदेमध्ये दर्शविण्यात आलेले दर हे संपुर्ण करासह असावेत. निविदेमध्ये दर्शविण्यात आलेले दर हे पुढील एक वर्षासाठी लागु राहतील.

२. प्राप्त निविदा ह्या प्राप्तीच्या नमुद केलेल्या शेवटच्या दिवशी कार्यालयीन वेळेत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, परभणी यांच्या समक्ष उघडण्यांत येतील.

३. प्राप्त निविदा रद्द करण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, परभणी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

४. निविदेमध्ये संबंधीत एजंन्सीने त्यांच्या फर्मचा सी.एस.टी./जी.एस.टी नंबर नमुद करावा.

५. निर्देशीत तारीख व वेळेनंतर येणारे दरनिविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

६. निविदेमध्ये संबंधीत एजन्सीने त्यांच्या फर्मचा शिक्का व सही असणे आवश्यक आहे. सही व शिक्का नसल्यास निविदा रद्द करण्यांत येईल.

आदेशान्वये

जा.क्र./वित्त/संगणक / 2500/२०१९
जिल्हा व सत्र न्यायालय, परभणी
दिनांक :- २० फेब्रुवरी २०१९

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, परभणी

प्रत:-

१. नोटीस बोर्ड जिल्हा न्यायालय, परभणी/ दिवाणी न्यायालय व. स्तर, न्यायालय, परभणी / मुख्यन्यायदंडाधिकारी, न्यायालय, परभणी येथे प्रसिध्दीसाठी मुख्य बेलीफ, जिल्हा न्यायालय, परभणी यांनी डकवुन रिर्पोट सादर करावा.

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, परभणी